पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, मे २०२१, खंड २०, अंक २, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● टोचणी

५ ● प्रगतिशीलतेचे सिंगापूर 'मॉडेल'

११ ● आव्हान बोलीभाषा जपण्याचे...

१९ ● पूरस्थिती रोखण्याचा जपानी मार्ग

२५ ● न उलगडलेले गूढ उडत्या तबकड्यांचे


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी


**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २० (अंक २) मे २०२१**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**


### *अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# टोचणी

मनातील विचार-विकारांच्या प्रगट अभिव्यक्तीचे साधन म्हणून आपण भाषेकडे बघत असतो. भाषेच्याच माध्यमातून परस्परांमध्ये संवाद प्रस्थापित होत राहतो आणि फुलतोदेखील. पण म्हणून, केवळ या पुरतेच भाषेचे महत्व आणि माहात्म्य सीमित नाही. कोणत्याही लोकसमूहांची भाषा ही, वास्तविक पाहता, त्या त्या समूहांच्या संस्कृतीचे प्रवेशद्वारच होय. संस्कृतीच्या अंतरंगापर्यंत आपल्याला पोहोचता येते ते भाषेचा हात धरूनच. त्यांमुळे, काळाच्या ओघात एखाद्या जनसमूहाची भाषा व्यवहारातून बाहेर गेली तर त्या समूहाच्या संस्कृतीची ओळख करून घेण्याचे हुकूमी हत्यारच आपल्या हातातून निसटून जाते. एक भाषा लोकव्यवहारातून लोप पावणे म्हणजे, व्यापक अर्थाने, संबंधित समूहाच्या समग्र संस्कृतीच्या अंतरंगाचा परिचय करून घेण्याचे माध्यमच गमावून बसणे होय. एखादी भाषा लोप पावण्याने होणारी ही हानी खरोखरच कधीही भरून न येणारी अशीच असते. संबंधित भाषा ज्या लोकसमूहाची ओळख जगाला करून देत असते ती भाषा लयाला जाणे, या वास्तवाचे पैलू खरोखरच अनंत असेच. तो लोकसमूह, त्याची उत्पत्ती, उत्क्रांती, जडणघडण, इतिहास, समूहांतर्गत रचना, नातेसंबंध, श्रद्धाविश्व, देव-दैवते, लोकधारणा, पेहराव-आहार-विहार-निवारा, सामाजिक संबंध, अन्य जनसमूहांशी जोपासलेले नाते, विचारविश्व, लिखित तसेच अलिखित साहित्य, म्हणी व वाक्प्रचार, घराणी व त्यांचा इतिहास...अशा अक्षरशः अनंत बाबी भाषेच्या बरोबरच काळाच्या विशाल उदरात गडप होऊन जातात. विशेषतः ज्या भाषांना त्यांची म्हणून वेगळी, स्वतंत्र अशी लिपी नाही अथवा नसते, अशा भाषा जगातून लुप्त होण्याने जी हानी घडून येते ती कधीच भरून काढता येत नाही. कारण, अशा समूहांच्या संदर्भातील काहीही तपशील उत्तरकालीन पिढ्यांना लिखित अथवा मुद्रित माध्यमांतून उपलब्ध होण्याच्या शक्यता मुळातूनच उखडल्या जातात. म्हणजे, अशा काही, लिपीबद्ध न झालेल्या भाषा आणि त्यांचा विनियोग करणारे काही संबंधित जनसमूह या पृथ्वीच्या पाठीवर कधी काळी, कोणत्या तरी भूभागावर काही काळ का होईना नांदत राहिले, याच्या पाउलखुणादेखील जगाला उमगणे शक्यतेच्या पलीकडेच. या भीषण आणि तितक्याच भयाण वास्तवाची जाणीव करून देणारा 'अर्थबोधपत्रिके'च्या अंकातील लेख, भाषांच्या जपणुकीसंदर्भातील आपल्या सुप्तासुप्त संवेदनशीलतेला आवाहन करील, अशी निदान अपेक्षा तरी आहे.



मुळात, मोबाइल फोन आणि त्याच्या माध्यमातून हाताशी आलेल्या अनेकानेक संवाहन सुवधांपायी आपल्या प्रत्येकाच्याच, आपण लहानपणापासून शिकत-वापरत आलेल्या भाषेचा पोत अंतर्बाह्य पालटून गेल्याचे वास्तव अलीकडील काळात आपण सगळेच अनुभवतो आहोत. खास मोबाइलची अशी म्हणून एक वेगळीच भाषा आपल्या सगळ्यांच्या दैनंदिन व्यवहाराचे अविभाज्य अंग बनत असली तरी तिच्यापायी, मूळ भाषेतील अनेकानेक शब्द, त्यांची रूपे, छटा, वाक्यरचना आपणच विसरून जाऊ लागलेलो आहोत, हे तर कोणीच नाकारणार नाही. येणा-या प्रत्येक पिढीची म्हणून अशी एक निराळी भाषा असणारच. ते वास्तव तर स्वीकारलेच पाहिजे. तरीदेखील, मुळात वापरातून हद्दपार झालेले शब्द व भाषालकबी त्या त्या शब्दांशी निगडित असलेल्या पारंपरिक सांस्कृतिक, सामाजिक संकेत, स्मृती, परंपरा, अशा विविध बाबीही आपल्याबरोबर घेऊन भूतकाळात गडप होत जातात, या जाणिवेची टोचणी लागायची ती लागतेच. तशी ती लागणारच. ***(कृपया, पृष्ठ क्रमांक २९ पाहावे)***

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आंतरराष्ट्रीय

# प्रगतिशीलतेचे सिंगापूर 'मॉडेल'

अत्याधुनिकता आणि पारंपरिकता यांचा सुरेख संगम असणारा सिंगापूर देश म्हणजे पर्यटकांच्या गळ्यातील ताईत आहे. परदेशात फिरायला जायचे म्हटले तर पहिली पसंती असते ती सिंगापूरलाच. उंचच उंच टोलेजंग इमारती, डोळ्यांचे पारणे फिटून जावे अशा पद्धतीची शहरे, असंख्य शॉपिंग मॉल्स आणि त्या सगळ्यांतून जपलेला संस्कृतीचा धागा असे दर्शन या देशात पावलापावलावर होत राहते. अवघ्या पन्नास वर्षांच्या कालावधीत शून्यातून सुरुवात करून सिंगापूरने प्रगतीचे शिखर गाठले आहे. हा प्रवास कुणालाही थक्क करेल असाच आहे. एका छोट्याशा देशाने ही नेत्रदिपक प्रगती साध्य करीत असताना नेमकी कोणती पावले उचलली आणि कोणती ध्येयधोरणे राष्ट्रीय पातळीवर ठरवून ही प्रगतीची दिशा निश्चित करण्यात आलेली होती, हे जाणून घेणे निश्चितच उद्‌बोधक ठरावे.

तिस-या जगातील एक अत्यंत गरीब देश अशी सिंगापूरची ओळख होती. परंतु, अवघ्या ५३ वर्षांच्या कालावधीत सिंगापूरने अक्षरशः कायापालट घडवून आणला आहे. श्रीमंत देशाच्या यादीत हा देश विराजमान झालेला आहे. सिंगापूरची धुरा Lee Kuan Yew यांनी जेव्हा स्वीकारली तेव्हा देशातील सकल देशांतर्गत उत्पादन हे प्रतिवर्षी दरडोई ४०० अमेरिकी डॉलर्स इतकेच होते. तुलनाच करून सांगायची झाली तर मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या बरोबरीने सिंगापूरची अर्थव्यवस्थाही कशीबशी रांगत होती. परंतु, अर्धशतकी कालावधीनंतर मात्र या देशाने जी प्रगती साध्य केलेली आहे त्या नंतर देशाचे सकल देशांतर्गत उत्पादन दरडोई ५० हजार अमेरिकी डॉलर्स इतके झालेले आहे.

प्रगतीचा हा आलेख उंचावत नेण्याचा आणि देशाला विकसित करण्याचा प्रवास खचितच सोपा नव्हता. अनेक प्रकारच्या प्रतिकूलतांचा सामना करीत या देशाने खडतर परिस्थितीतून वाटचाल केलेली आहे. १९६५ साली मलेशियाच्या वर्चस्वातून सिंगापूर मुक्त झाला. अगदी लहानसा आणि अतिशय गरीब असा हा देश होता. अनेक स्थलांतरित येथे येऊन राहत असल्याने संमिश्र लोकवस्ती होती. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये सर्वच लोकांना गुजराण करावी लागत होती. उत्पन्नाची



साधनेही अतिशय मर्यादित होती. उद्योगधंद्यांचा विकास झालेला नव्हता आणि या सगळ्यांत भरीस भर म्हणून टोकाची प्रतिकूलता होती. बेरोजगारी, शिक्षणाचा अभाव, निकृष्ट दर्जाची घरे, जमिनीची कमतरता अशी सगळ्याच प्रकारची आव्हाने देशाच्या पुढ्यात होती. अन्न, पाणी आणि ऊर्जा या तिनही मुलभूत गोष्टींसाठी सिंगापूरला बाहेरील देशांवर अवलंबून राहावे लागत होते. कोणत्याच उद्योगधंद्यांचा विकास झालेला नव्हता. लोक पारंपरिक मार्गांनीच कशीबशी गुजराण करीत होते. त्याच काळात आजुबाजुच्या देशांमध्ये मात्र नैसर्गिक साधनास्रोतांची मुबलकता होती. सिंगापूरमध्ये त्याची वानवा होती.

अशा परिस्थितीवर मात करून प्रगती साधायची तर काही धाडसी निर्णय घेणे आणि त्या दिशेने कृतिशील पावले उचलणे गरजेचे होते. अन्य देशांवर असणारे अवलंबित्व कमी करून देशाला स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर करण्याचे मोठे आव्हान देशापुढे होते. नैसर्गिक संसाधनांची मुबलकता, कुशल मनुष्यबळ आणि विस्तृत जागेची उपलब्धता या सगळ्या चांगल्या बाबी शेजारील देशांच्या पारड्यात असताना त्यांच्याबरोबरीने सिंगापूरसारखा देश उभा करणे हे खरोखरीच एक मोठे आव्हान होते. अन्य देशांपेक्षा स्वतःचे वेगळेपण सिद्ध तरी कसे करायचे ही समस्या देशापुढे होती. मात्र, हे सारे असतानादेखील ज्या पद्धतीने या देशाने धाडसी पावले उचलली आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू केली ती सारीच प्रक्रिया कुणालाही अवाक करून सोडेल अशीच होती.

देशापुढील सर्व मर्यादा आणि प्रतिकूलता लक्षात घेऊन सिंगापूरचे पंतप्रधान Lee Kuan Yew यांनी राष्ट्रीय धोरण आखले. त्या अंतर्गत निर्यातीला आणि थेट परकीय गुंतवणुकीला मान्यता देण्याचा एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. देशांतर्गत कायदा सुव्यवस्था सक्षम करण्यावर आणि पारदर्शक सरकारी प्रणाली उभारण्यावर भर देण्यात आला. तेव्हापासून सिंगापूरने आपले दरवाजे जागतिक बाजारपेठेसाठी खुले केले. गुंतवणूकदारांसाठी विश्वासार्ह वातावरण निर्माण करण्यावर सर्वाधिक भर देण्यात आला. औद्योगिक प्रगती साध्य करण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना लाल पायघड्या घालण्यात आल्या. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, उत्तम प्रशिक्षित कर्मचारी, प्रभावी संवादयंत्रणा आणि वेगवान इंटरनेट सेवा अशा सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सिंगापूरने जाणीवपूर्वक उचललेली ही पावले पारंपरिक पद्धतीने देश जसा चालत होता त्याच्या अगदी विरोधातील होती. तितकीच धाडसी होती.

या धोरणाचे चांगले परिणाम काही कालावधीतच दिसू लागले आणि सिंगापूरचे हे धोरण यशस्वी ठरून त्याचा लाभ होत असल्याचे निदर्शनास आले. जागतिक पातळीवर सौहार्दपूर्ण व विश्वासार्ह संबंध प्रस्थापित करून स्थिर व्यापार भागीदारी करण्यावर सिंगापूरने पुढील काळात भर दिला. कायद्याचे सुटसुटीत नियम, व्यापारातील खुलेपणा आणि वाजवी करप्रणाली यामुळे परदेशी गुंतवणूकदार हळूहळू सिंगापूरकडे आकर्षित होऊ लागले. व्यवसायाला पोषक ठरेल असे वातावरण, स्थैर्य आणि कुशल मनुष्यबळ यांच्यावर लक्ष केंद्रित करून परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळत राहिल याची काळजी घेतली गेली. जगभरातील चांगल्या प्रतिभावंतांना आपल्या देशात येऊन काम करावेसे वाटावे आणि जगातील मोठमोठ्या कंपन्यांना त्यांची प्रमुख कार्यालये इथेच सुरू करावीशी वाटावीत यासाठी उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यावर भर देण्यात आला. त्यासाठी दर्जेदार विमानसेवा व जलवाहतूक सेवा देणे अनिवार्य होते.

बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी आपले दरवाजे खुले करीत असताना स्वागतशील असले पाहिजे मात्र त्याचवेळी देशातील कायदा-सुव्यवस्था सक्षम राखणे आवश्यक असते. ही दुहेरी कसरत सिंगापूर सरकारने उत्तम रीतीने सांभाळली आणि त्यात ते यशस्वी होत गेले. त्यामुळे जगभरातील मोठ्या बँका, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपन्या सिंगापूरस्थित झाल्या आणि तिथे मिळणा-या सेवांविषयी त्या समाधानी राहिल्या. जागतिक बाजारपेठैला सामावून घेण्याचे एक नवे प्रारूप सिंगापूरने जगासमोर ठेवले. सिंगापूरची प्रगती अतिशय वेगाने होत गेली. बक्कळ पैसा खेळता राहू लागला. अत्याधुनिक दर्जाचा विकास साधणे देशाला सहजशक्य झाले. 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप'चे प्रारूप प्रभावी ठरले. छोटासा देशही निर्धाराने व सुयोग्य प्रयत्नांमुळे प्रगती कशी करू शकतो याचा वस्तुपाठ म्हणजे सिंगापूरमधील विकासाचे उदाहरणे होते. देशातील मर्यादित साधनास्रोतांचा पुरेपूर वापर करून अधिकाधिक लोकांचे जनजीवन स्थिर आणि सुरक्षित कसे करता येईल याचा प्रयत्न सरकारने जाणीवपूर्वक केला. कोणत्याही देशाच्या कायदा सुव्यवस्थेची चौकट ही केवळ संकल्पनेच्या पातळीवर महान असून चालत नाही तर परस्परांमधील नातेसंबध आणि देशाचे सार्वभौमत्व या दोन्ही पातळ्यांवर प्रभावी ठरते आहे की नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरत असते.

सिंगापूरने जेव्हा बदलायचे ठरवले आणि नव्या आर्थिक धोरणांचा धाडसाने अंगीकार केला. त्याचकाळात आर्थिक उदारीकरणाचे वारे वाहू लागलेले होते. त्यामुळे



सिंगापूरचे धोरण तत्कालीन लोकांना थोडे धाडसाचे किंवा पारंपरिक चौकटींना भेदून पलीकडे जाणारे वाटले हे खरे. परंतु दीर्घकालीन दृष्टीने विचार केला तर सिंगापूरने काळाची पावले ओळखलेली होती, असेच अभ्यासकांचे मत आहे. नवे धोरण अंगिकारल्यापासून पहिल्या दोन दशकांमध्येच सिंगापूरच्या अर्थव्यवस्थेत १० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. १९७५ सालापर्यंत सिंगापूरमध्ये आवश्यक असणा-या सर्व औद्योगिक पायाभूत सुविधा प्रस्थापित झालेल्या होत्या. देशातील उत्पादकता वाढल्यामुळे सकल देशांतर्गत उत्पादनदेखील १४ टक्क्यांवरून वाढून ते २२ टक्क्यांवर गेले. उद्योजकता वाढली तशा नव्या रोजगाराच्या संधीदेखील मिळत गेल्या. कौशल्यकेंद्रित अशा नव्या मूल्यवर्धित सेवा देण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे सिंगापूरमधील पायाभूत सुविधांविषयी बहुराष्ट्रीय कंपन्यांचे मत चांगले बनले आणि त्यांनी या देशात प्रमुख कार्यालये स्थापन केली. १९७० च्या अखेरीस इलेक्ट्रॉनिक्स, पेट्रोकेमिकल्स आणि इतर औद्योगिक कंपन्यांची 'क्लस्टर्स' येथे उभी राहू लागली. १९८० सालापर्यंत जगातील सर्वाधिक 'हार्ड ड्राईव्ह' पुरवणारा देश म्हणून सिंगापूरची एक स्वतंत्र ओळख जगात प्रस्थापित झाली. अवघ्या तीन दशकांच्या कालावधीत या देशाने एक मोठी झेप घेतलेली होती. सिंगापूरमध्ये घडत असलेले हे सगळेच बदल लक्षणीय होते. खरोखरीच शून्यातून विश्व निर्माण करण्याचा प्रवास होता.

ही वाटचाल करीत असताना Lee Kuon Yew यांनी महासत्ता असलेल्या अमेरिकेचा खूप बारकाईने अभ्यास केला. अमेरिकेच्या समृद्धतेला धोका निर्माण करणा-यांविषयी आणि एकूणच आशियाई देशांविषयी अमेरिकेचा दृष्टिकोन नेमका काय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आशियाई संस्कृती व अमेरिकी संस्कृतीतील भिन्नता जाणून घेण्यावर भर दिला. अमेरिकी संस्कृतीमध्ये व्यक्तिगत हिताला अधिक प्राधान्य देतानाच एक समाज म्हणून त्यांची जडणघडण कशी झालेली आहे हे त्यांनी जाणून घेण्यावर भर दिला. सामूहिक पातळीवर अधिक आक्रमक, स्पर्धात्मक आणि उत्तम कामगिरी करून स्वतःला सिद्ध करण्यासाठी आग्रही असलेला अमेरिकी समाज कुठे कमी पडतो आहे हेदेखील जाणण्यावर भर दिला. अमेरिकी लोकांमधील सर्जनशीलता आणि उद्योजकतेची प्रेरणा या गुणांची दखल त्यांनी आवर्जून घेतली. नवनवीन कल्पना, नवे आविष्कार, त्याचा अंगीकार करणा-या नव्या उद्योगसंस्था आणि निकोप असे स्पर्धात्मक वातावरण या सगळ्यांचे स्वागत अमेरिकेत होते आणि जगभरातील उत्तमोत्तम प्रतिभा व प्रतिभावंतांच्या बाबतीत हा देश स्वागतशील आहे

आणि तो अशा सर्वांना आनंदाने सामावून घेतो, हे त्यांच्या लक्षात आले. विज्ञान, तंत्रज्ञान, नवसंशोधन, व्यवसाय, शिक्षण, मुत्सद्देगिरी, समाजातील प्रभावशाली व्यक्ती अशा सर्वच बाबतीत अमेरिकेचे धोरण खुलेपणाचे आहे. अमेरिकन समाज हा एक पुढारलेला समाज असून तिथे नव्याने उद्योग सुरू करणा-यांना आणि त्यातून संपत्ती निर्माण करू पाहणा-यांना प्रोत्साहन दिले जाते. व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरता या गोष्टींना तिथे अधिक महत्त्व आहे. नवीन व्यवसाय सुरू करणा-यांविषयी अमेरिकी लोकांमध्ये आदरभाव असतो. नव्या उद्योगांची पायाभरणी करताना आणि नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या प्रयत्नांमध्ये अपयश आल्यास तेदेखील उमदेपणाने स्वीकारले जाते या सर्व गोष्टींवर अमेरिकेचा असलेला भर त्यांनी समजून घेतला. हेच अमेरिकेच्या यशस्वितेचे गमक आहे, ही वस्तुस्थिती Lee Kuon Yew यांच्या लक्षात आली. त्याचवेळी दुसरी बाजू समजून घेताना व्यक्तिगत वर्चस्वाच्या कल्पना टोकाला जातात तेव्हा देशासाठी त्या धोकादायक ठरतात हे अमेरिकेकडे पाहूनच त्यांच्या लक्षात आले. खुलेपणाने वावरू शकणारा आणि मादक पदार्थांच्या आहारी न जाणारा समाज आपल्याला हवा असेल तर अमेरिकेचे प्रारूप वरकरणी कितीही चांगले वाटले तरी जसेच्या तसे उचलून चालणार नाही हेदेखील त्यांनी जाणले. अमेरिकेतील समाजव्यवस्था आज उद्‌ध्वस्त होण्याच्या वाटेवर असल्याने तिच्यातील केवळ चांगल्या बाबींचा अंगीकार करता येऊशकेल हे दूरदर्शीपण Lee Kuon Yew यांच्याकडे होते. त्याप्रमाणे त्यांनी अमेरिकी संस्कृतीतील चांगल्या गोष्टी सिंगापूरवासियांच्या जीवनशैलीचा व कार्यसंस्कृतीचा भाग कसा होतील असा प्रयत्न केला. सिंगापूरने आपल्या राष्ट्रीय धोरणातच काही बाबी समाविष्ट केल्या आणि त्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग आजची सिंगापूरची समाजव्यवस्था दिसून येते.

सिंगापूरने राष्ट्रीय धोरणात समावेश केलेला आहे ती बाब म्हणजे, यशस्वी होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा समुदाय उभा करणे. हा समुदाय चुकीच्या गोष्टींना आदर्श न मानता सतत आपल्या विकासासाठी प्रयत्नशील राहणे अशी अपेक्षा आहे. कोणत्याही व्यवसायासाठी आवश्यक असणारे दूरदर्शी व्यवस्थापन उभे करण्यासाठी विशेषत्वाने प्रयत्न करणे. तिसरे म्हणजे, सामूहिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणारी लवचिकता. व्यक्तीकेंद्रितता अनेकदा नुकसानकारक ठरत असते. त्यामुळे हे लक्षात घेऊन आपल्याला देशाची प्रगती साध्य करण्यासाठी जे लक्ष्य गाठायचे आहे त्यासाठी सर्वांनी मिळून एकत्रितपणे प्रयत्न करणे. या तीन बाबींना राष्ट्रीय धोरणात



समाविष्ट केल्याने देशाच्या प्रगतीसाठी त्या उपयुक्त ठरत असल्याचे लक्षात आले. त्यामुळेच जगातील एक उत्तम आणि प्रभावी प्रशासन व्यवस्था उभारण्यात सिंगापूरला अल्पावधीत यश आले. सिंगापूरने साध्य केलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. सक्षम नेतृत्व, प्रभावी प्रशासन आणि सामाजिक शिस्त या त्रिसूत्रीच्या बळावर सिंगापूरने प्रगतीशीलतेची घोडदौड अखंडपणे सुरू ठेवलेली आहे. सिंगापूरसारखा एक छोटेखानी देश उभा राहत असताना सामाजिक आणि आर्थिक अशा दोन्ही पातळ्यांवर खूप प्रयत्न करावे लागणार आहेत हे लक्षात घेऊन कार्यक्षम प्रशासनावर भर देण्यात आला. जमिनीचा पुरवठा हा नेहेमी सर्वत्रच कमालीचा अ-लवचीक असतो. बांधकामांसाठी उपलब्ध असणा-या जागेची मर्यादा लक्षात घेऊन लोकांच्या निवासाचा प्रश्न सोडवण्यासाठी व त्यांच्या भौतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी गगनचुंबी इमारती उभारण्यात आल्या. रोजगार निर्मिती होण्यासाठी औद्योगिकीकरण आणि थेट परकीय गुंतवणुकीला चालना देण्यात आली. त्यामुळेच सर्व प्रतिकूलतांवर मात करीत सिंगापूरच्या अर्थव्यवस्थेचा आलेख सतत उंचावत गेला.

अमेरिकेतील चांगल्या गोष्टींचा अंगिकार करताना सिंगापूरने स्वतःचे म्हणून वेगळेपण निश्चितपणाने जपले. अमेरिकेत व्यक्तीस्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे ठरते परंतु सिंगापूरने सामाजिकता जपण्यावर अधिक भर दिला आहे. त्यामुळे सरकारने एखादी मोहिम सुरू केली किंवा नवा एखादा निर्णय जाहीर केला तर सामाजिक शिस्तीचा भाग म्हणून तिचा अंगीकार केला जातो आणि सिंगापूरमधील नागरिक सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून त्याचे कसोशीने पालन करताना दिसतात. सामाजिक जाणीवा रुजवण्यासाठी विविध प्रकारच्या मोहिमा सिंगापूरमध्ये सातत्याने राबवण्यात येतात. नागरिकांचाही त्यांना उत्तम प्रतिसाद मिळतो. लोकसंख्या नियंत्रणासाठी ‘स्टॉप ॲट २’, निरोगी आहार घ्यावा म्हणून ‘नज थिअरी’, स्वच्छतेसाठी ‘कीप सिंगापूर क्लीन’, पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी ‘प्लांट ट्रीज’ या सारख्या मोहिमा त्याची बोलकी उदाहरणे आहेत. सुसंस्कृत आणि समंजस समाज तयार व्हावा यासाठी ‘नॅशनल कर्टसी कँपेन’ हाती घेण्यात आले. त्यालाही नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. व्यापारस्नेही वातावरण डोळसपणे अवलंबून सिंगापूरने स्वतःला जगाशी जोडून घेतले आणि प्रयत्नपूर्वक जोपासलेल्या सुसंवादाद्वारे देशी-विदेशी नागरिकांचा विश्वासही संपादन केला. यशाचा मार्ग निर्धाराने कसा आखता येतो याचे एक जागते उदाहरण म्हणून सिंगापूरच्या या प्रयत्नांकडे पाहावे लागते. ■■

**सामाजिक**

# आव्हान बोलीभाषा जपण्याचे...

'लिचो'.नावाच्या एका महिलेचा चार एप्रिल २०२० रोजी मृत्यू झाला अशी वृत्तपत्रांत आलेली एक छोटीशी बातमी टाळेबंदीच्या त्या ऐन माध्यान्ही दरम्यान कोणाच्या लक्षातही राहिली नाही. 'अंदमानातील एका महिलेचा मृत्यू' एवढेच त्या घटनेचे महत्त्व नव्हते. 'लिचो' या देहावसानाबरोबर अंत घडून आला एका संस्कृतीचा! कारण 'लिचो' च्या जाण्याने Sare नावाची एक चांगली बोलीभाषा कायमची लुप्त झाली. अंदमानातील दक्षिण द्विपावर राहणा-या 'ग्रेट अंदमानी' या जातीसमूहाची 'लिचो' ही सदस्य होती. परंपरेने चालत आलेली Sare भाषा ती नेहमी बोलत असे. काही वर्षांपूर्वी तिच्यासमवेत ही भाषा बोलणारे, तिच्याशी या भाषेतून संवाद साधणारे अनेक लोक होते. परंतु हळूहळू परिस्थिती बदलत गेली. ही बोलीभाषा संवादातून मागे पडत गेली आणि नव्या भाषेकडे लोक आकर्षित होत गेले. साहजिकच या भाषेतून होणारा संवादही कमी होत गेला. आजारपणाने ग्रस्त असणा-या 'लिचो'चा जीव मात्र शेवटच्या क्षणापर्यंत मातृभाषेत गुंतलेला होता. भाषा लुप्त होत असल्याच्या दुःखातून ती जात होती. जिवंत असेपर्यंत तिने बोलीभाषेतूनच बोलण्याचा आग्रह आपल्या जातीसमूहातील प्रत्येकाला नेहमीच केला. शेवटच्या क्षणापर्यंत ही महिला तिच्या समुदायातील लोकांना मूळ भाषेचे महत्त्व समजावत राहिली. परंतु, तिचे म्हणणे कुणी मनावर घेतले नाही. परिणामतः एक दिवस असा उजाडला की Sare भाषा बोलू शकणारी व त्यातील शब्दार्थांची नेमकी जाण असणारी अंदमानातील ती एकमेव महिला उरली. तिच्या मृत्यूनंतर ती भाषाही आता कायमची लुप्त झाली.

विविध बोलीभाषांचे जतन व संवर्धन करण्यासाठी अनेक वर्षे प्रयत्न करणा-या भाषावैज्ञानिक Anvita Abbi या अंदमानमध्ये गेल्या दोन दशकांपासून बोलीभाषांचा अभ्यास करीत होत्या. 'द ग्रेट अंदमानी' भाषेचा स्वतंत्र शब्दकोश तयार करण्याचे अतिशय महत्त्वाचे काम त्यांनी केले. या कामामध्ये अंदमानातील 'लिचो'ने त्यांना खूप मदत केलेली होती. हा शब्दकोश साकारत असताना Anvita Abbi यांनी लुप्त होत चाललेल्या बोलीभाषा वाचणार कशा या विषयी चिंता व्यक्त केली होती. अंदमानातील Sare भाषा लुप्त झाली हे केवळ एकमात्र उदाहरण नव्हे. संवादातून



हरवत चाललेल्या अनेक बोलीभाषा आजघडीला मरणपंथाला लागलेल्या आहेत. अंदमानातीलच Jarava नावाची आणखी एक बोलीभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. ही भाषा बोलू शकणारे केवळ २६६ लोक आजमितीस अंदमानात आहेत. अशी देशभरातील व जगभरातील कितीतरी उदाहरणे सांगता येतील.

मानवजातीचा आजवरचा प्रवास हजारो वर्षांचा आहे आणि त्यात भाषेचे योगदान मोठे आणि महत्त्वाचे आहे. आफ्रिकेतून हजारो वर्षांपूर्वी बाहेर पडलेले आदिवासी दक्षिण आशिया, न्यू गिनी आणि ऑस्ट्रेलिया या ठिकाणी स्थलांतरित झाले. पैकी अनेक आदिवासींनी अंदमानात मुक्काम ठोकला. तिथल्या मातीत ते रुजले आणि तेथील जैवविविधतेशीही एकरूप झाले. बाहेरच्या इतर संस्कृतींशी त्यांचा कधी संपर्कही आला नाही. त्यामुळे परस्परांतील संवादासाठी त्यांनी स्वतःची एक भाषा तयार केलेली होती. प्रत्येक संकल्पनेसाठी या भाषेमध्ये विशिष्ट शब्दांची योजना केलेली होती. परंतु, या भाषेची कोणतीही लिपी उपलब्ध नसल्याने लिखित स्वरूपात मात्र ती कुठेही नव्हती. चालता-बोलता माणूसच त्या भाषेचा खरा वाहक होता. पिढ्यानपिढ्या ती भाषा एका पिढीतून दुसरीकडे संक्रमित होत होती आणि नवनव्या शब्दांची भर पडत होती. अंदमानातील पोर्ट ब्लेअर येथे १८५८ साली ब्रिटिशांचे आगमन झाले आणि ती परिस्थिती बदलली. त्या वेळी या बेटावर सुमारे आठ हजार लोक पूर्वीपासून राहत होते. त्या वेळचे हे मूलनिवासी अंदमानी लोक 'बो' 'खोरा', 'सारे' आणि 'जेरू' अशा विविध प्रकारच्या बोलीभाषा बोलल्या जात असत. परंतु, बाहेरून आलेल्या लोकांमुळे जीवनशैलीसह विविध बाबींमध्ये हस्तक्षेप वाढू लागला आणि एक प्रकारचे सांस्कृतिक आक्रमण सुरू झाले. कालांतराने भाषिक आक्रमणही वाढत गेले आणि या जमातीची भाषा बोलणा-या लोकांची संख्या टप्प्याटप्प्याने कमी होत गेली. परिणामतः २०१० सालापर्यंत 'खोरा' आणि 'बो' ही भाषा बोलणारे लोक कमी कमी होत गेले. या भाषा बोलू शकणा-या वयोवृद्ध लोकांचे निधन झाले आणि या भाषा मृत्यूपंथाला लागल्या. २०१० सालानंतरच्या अवघ्या दशकभरात तीन बोलीभाषा अंदमानातून लुप्त झाल्या. आता अलीकडच्या संदर्भात पाहायचे झाले तर, पूर्वीच लुप्त झालेल्या तीन भाषांच्या पाठोपाठ 'जेरू' भाषादेखील संपण्याच्या वाटेवर आहे. कारण ही भाषा बोलू शकणारे केवळ तीनच लोक आता अंदमानात आहेत. या तिघांचेही वय पन्नाशीच्या पुढे असून ते विविध प्रकारच्या आजारांनी ग्रस्त आहेत. त्यामुळे आता अंदमानातील तीन भाषांच्या पाठोपाठ 'जेरू' भाषादेखील संपण्याच्या मार्गावर आहे, ही भाषातज्ज्ञांपुढील चिंता आहे.

अंदमानातील विविध बोलीभाषांवर जी वेळ ओढवलेली आहे तशीच स्थिती भारतातील व जगातील अनेक बोलीभाषांच्या बाबतीत उद्‌भवलेली आहे, असे भाषाअभ्यासकांचे निरीक्षण सांगते.

हिमाचल प्रदेशातील 'चिनाली' नावाची बोलीभाषा अशीच संकटात सापडली आहे. हिमाचल प्रदेशमध्ये 'चिनाल' या समुदायाचे ३१ हजारांहून अधिक लोक राहत आहेत. मात्र 'चिनाली' भाषा बोलू शकणारे आता केवळ १२० लोकच उरले आहेत. आपल्या मूळ भाषेवर प्रेम करणा-या 'चिनाल' समुदायातील जुन्याजाणत्या लोकांना मात्र आपली भाषा आता संपत चालली असल्याची वेदना खूपच अस्वस्थ करते आहे. 'चिनाली' भाषा बोलणारे लोक कमी होत चालल्याने या भाषेतील पारंपरिक लोकगीते आणि लोककथाही मागे पडत चालल्या आहेत. नवीन पिढीला मातृभाषेत संवाद साधणे कमीपणाचे वाटते. त्यामुळे ते आपली मूळ भाषा शिकायलासुद्धा तयार नाहीत. संवाद साधणे तर खूपच लांबची गोष्ट! रोजगाराच्या नव्या संधींच्या शोधात लोक दुस-या गावांमध्ये जातात आणि आपल्या मूळ भाषेपासून तुटत जातात. नव्या पिढीला बोलीभाषा बोलता येत नसल्याने आणि नव्याने शिकण्याची इच्छा नसल्याने मातृभाषेपासून आणि मातीपासून तुटत जाऊन आमची ओळखच संपून जाईल की काय, अशी खंत येथील स्थानिक रहिवासी आता व्यक्त करीत आहेत.

भाषाअभ्यासक फारुक अहमद मीर हे अनेक वर्षांपासून 'चिनाली' भाषेचा अभ्यास करीत आहेत. त्यांच्या मते, चिनाली भाषा बोलणा-या समूहातील युवकांनी या भाषेकडे पाठ फिरवल्यामुळे त्या भाषेच्या अस्ताला सुरुवात झाली आहे. येथील स्थानिक रहिवाशांशी संवाद साधून भाषेसंदर्भात एक सर्वेक्षण अलीकडे करण्यात आले. त्या वेळी जनसमूहातील ७५ टक्के नागरिकांनी त्यांच्या मूळ बोलीभाषेविषयी नकारात्मक भावना व्यक्त केली. जर लोकांनीच स्वीकारली नाही तर कोणतीही भाषा कशी टिकणार हा खरा कळीचा मुद्दा असून बोलीभाषांपुढील सर्वांत मोठे आव्हान तेच असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

लुप्त होत चाललेल्या भाषांमध्ये उत्तराखंड येथील 'जाड' नावाची आणखी एक भाषा आहे. तीदेखील अस्तंगत होण्याच्या वाटेवर आहे. तिथे राहणा-या जनसमूहांमध्ये पूर्वी लग्नसमारंभात किंवा विशेष प्रसंगी या भाषेतील गीते आवर्जून म्हटली जात असत. परंतु आता ते प्रमाण कमी झाले आहे. है सर्व मौखिक साहित्य असल्याने यातील कोणतीही गीते लिखित स्वरूपात उपलब्ध नाहीत. ती सर्व गीते परंपरेने



चालत आलेली होती. ही भाषा बोलणारे लोक जसजसे कमी होत आहेत तशी काळाच्या ओघात ही भाषासुद्धा नष्ट होऊन जाईल, अशी भीती वर्तवली जाते आहे. मणीपूरमधील 'तराओ' नावाची भाषा बोलू शकणारे जेमतेम ८०० लोक आता शिल्लक आहेत. बोलीभाषेचे महत्त्व किती आहे, हे सांगणारे एक उदाहरण सांगायचे झाले तर, हरितक्रांती होण्यापूर्वी ओडिशामध्ये कारापुट येथे पारंपरिक पद्धतीने शेती केली जायची. तिथे झालेल्या अभ्यासानुसार, पूर्वी पारंपरिक पद्धतीने तांदळाचे निरनिराळे असे १७०० वाण येथे पिकवले जात असत. त्या विषयीची सगळी माहिती स्थानिक बोलीभाषेत दडलेली होती. दुर्दैवाने काळाच्या ओघात बोलीभाषेचा वापर जसजसा कमी होत गेला तसतशी त्या भाषेत दडलेली ही मौलिक माहितीदेखील गेली. आजघडीला तांदुळ पिकविण्याची केवळ तीन ते चार प्रकार स्थानिकांच्या माहितीत आहेत. तांदुळाच्या प्रकारानुसार त्याची चव आणि अनुभूती व्यक्त करणारे शब्दही या भाषेत होते. भाषा अस्तंगत होताना भाषेसोबत तेही गेले. बोलीभाषेतील भाषिक वैभव मोठे विलक्षण असते. परंतु, ते समजून घेतल्याखेरीज लक्षात येत नाही. उदाहरणादाखल

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

सांगायचे झाले तर, 'खासी' या बोलीभाषेमध्ये जेवणासाठी 'बाम' असा शब्द आहे. परंतु या भाषेतून तो २० वेगवेगळ्या पद्धतींनी व्यक्त केला जातो. बोलण्यासाठी 'क्रीन' असा शब्द योजलेला आहे. तो ३८ पद्धतींनी व्यक्त केला जातो. मलेशियातील एका स्थानिक भाषेमध्ये 'धन्यवाद' हा शब्द प्रसंगानुरूप १६ प्रकारांनी वापरला जातो. ही सारी भाषिक वैशिष्ट्ये लक्षात घेतली तर बोलीभाषांची जपणूक किती महत्त्वाची आहे हे लक्षात येत जाते.

'युनेस्को'ने Atlas of the World's Languages in Danger हा बोलीभाषांसंदर्भातील अभ्यास केला आहे. गेल्या अनेक वर्षांत ज्या बोलीभाषा अस्तंगत होत आलेल्या आहेत त्याचा एकत्रित आढावा घेण्याचा प्रयत्न यात करण्यात आलेला आहे. 'युनेस्को'ने २००१ साली अभ्यास केला तेव्हा जवळपास ९०० भाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. काही काळानंतर २०१७ साली जेव्हा 'युनेस्को'ने पुन्हा या संदर्भात अभ्यास केला तेव्हा असे लक्षात आले की लुप्त होण्याची भीती असलेल्या भाषांची संख्या लक्षणीयरीत्या वाढलेली आहे. या अभ्यासातील आकडेवारीनुसार, १९५० सालापासून जगभरातील २३० भाषा अस्तंगत झालेल्या आहेत. जगभरातील २ हजार ४६४ भाषा लुप्त होण्याची आशंका या अभ्यासाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे. जागतिक स्तरावरील या अभ्यासातून विशेषत्वाने समोर येणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, जगभरातील भाषांमध्ये सर्वाधिक बोलीभाषा भारतीय आहेत. त्यामुळे भारताने या भाषांचे जतन करण्यासाठी तातडीने पावले उचलणे गरजेचे असल्याची अपेक्षा या अभ्यासाद्वारे व्यक्त करण्यात आलेली आहे.

'युनेस्को'च्या अभ्यासानुसार, 'अहोम', 'आंद्रो', 'रांगकास', 'सेंगमई' आणि 'तोल्चा' या भारतीय बोलीभाषांचे अस्तित्व संपल्यात जमा आहे. पुढील काही वर्षांत १९७ भारतीय भाषांचे अस्तित्व संपलेले असेल, अशीही भीती या अभ्यासाद्वारे व्यक्त करण्यात आलेली आहे. भारताच्या खालोखाल अमेरिका आणि ब्राझील या देशांतील बोलीभाषा धोक्यात आहेत. मरणोन्मुख होऊ घातलेल्या भाषांची वेगाने वाढणारी ही संख्या लक्षात घेता अशा सर्व बोलीभाषांचे जतन करायचे कसे हे एक मोठेच आव्हान भाषाअभ्यासकांच्या पुढ्यात उभे ठाकलेले आहे. अभ्यासकांच्या मते, मौखिक भाषा मृत होण्याचे प्रमाण यापूर्वीसुद्धा होते. परंतु, आजघडीला त्याचा जो वेग दिसून येतो आहे तो मात्र केवळ अपूर्व असाच आहे. भाषा संपुष्टात येण्याचा हा वेग



असाच कायम राहिला तर लुप्त होण्याच्या मार्गावर असलेल्या भाषांपैकी ५० टक्क्यांहून अधिक भाषा या शताब्दीच्या अखेरपर्यंत कायमच्या संपलेल्या असतील, अशी भीती भाषाअभ्यासक व्यक्त करत आहेत.

भारतीय भाषांसंदर्भात People's Linguistic Survey of India ने अलीकडेच केलेल्या अभ्यासामध्ये अनेक भाषांच्या भवितव्याविषयी चिंता उपस्थित केलेली आहे. या सर्वेक्षणामध्ये जवळपास ७८० भारतीय भाषांचा अभ्यास करण्यात आला. त्या पैकी ६०० भाषा काळाच्या पडद्याआड जाण्याची भीती वर्तवली जाते आहे. गेल्या ५० वर्षांत २२० भाषांचा शेवट झाला असल्याची माहिती या अभ्यासातून समोर आलेली आहे. इंडोनेशियामध्ये ६०० हून अधिक बोलीभाषा आहेत. त्यांतील अनेक भाषांचे भवितव्य अंधारात आहे.

जगभरातील विविध भाषांच्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे काम Ethnologue या संघटनेच्या माध्यमातून केले जाते. या संस्थेच्या अभ्यासानुसार, जगभरात सुमारे ७हजार १३९ भाषा बोलल्या जातात. त्या पैकी, जवळपास ४२ टक्के म्हणजे ३०१८ भाषा आज संपण्याच्या वाटेवर आहेत. कोणती भाषा संकटात आहे आणि आणखी किती काळ ती तग धरून राहू शकेल याचा अंदाज येण्यासाठी Ethnologue च्या माध्यमातून काही मापदंड निश्चित करण्यात आलेले आहेत. लुप्त होत चाललेल्या भाषांचे एक वास्तव दर्शन होण्यास त्यांद्वारे मदत होते. मापदंड निर्धारित करण्याच्या या पद्धतीला Expanded Graded Intergenerational Disruption Scale असे नाव देण्यात आलेले आहे. या अभ्यासानुसार, जगभरातील विविधतेमुळे भाषांची विभागणीसुद्धा असमान पद्धतीने झालेली आहे. जगातील जवळपास निम्मी लोकसंख्या अवघ्या २४ भाषा बोलते. त्यामध्ये चिनी, स्पॅनिश, इंग्रजी, हिंदी, पोर्तुगीज, बंगाली, रशियन, जपानी, जर्मन आदी प्रमुख भाषांचा समावेश आहे. जगभरातील कोट्यवधी लोक या प्रमुख भाषा बोलतात आणि उर्वरित जगातील लोक मिळून सात हजार भाषा बोलतात. यात अनेक भाषा अशाही आहेत ज्या बोलू शकणा-या लोकांची संख्या आज घटकेला दहा हजारांपेक्षाही कमी आहे. किंबहुना, पाच हजार भाषा अशा आहेत ज्या बोलणा-या लोकांचे प्रमाण एकूण लोकसंख्येमध्ये जेमतेम एक टक्का इतकेच आहे. जगभरातील लोकसंख्या २५ टक्क्यांनी वाढली तेव्हा अधिकतर जनसमूहाकडून बोलल्या जाणा-या हिंदी, इंग्रजी आदी भाषा बोलणा-यांची संख्या वाढली. परंतु, लहान जनसमुदायांच्या बोलीभाषांची संख्या मात्र या काळात कमी कमी होत गेली.

विशिष्ट बोलीभाषा बोलणारे लोक त्या भाषेऐवजी दुस-या भाषेचा स्वीकार करतात किंवा ती बोलीभाषा बोलणा-या लोकांची संख्याच कमी होत जाते त्यावेळी ती बोलीभाषा धोक्यात येऊ लागते. हळूहळू नवीन पिढीला तिच्या मातृभाषेचा विसर पडतो आणि ती भाषा मृतवत होत जाते. व्यापार आणि संवादासाठी काही ठरावीक भाषांचाच वापर केला जात असल्याने अनेकदा लहान समूहांच्या बोलीभाषा उपेक्षित राहतात. आधुनिकतेच्या प्रसारामुळे आणि जग अधिकाधिक जवळ येत असल्याकारणाने मूळ भाषेपेक्षा जी भाषा जगात, समाजात अधिक बोलली जाते त्या भाषेचा अंगिकार करण्याकडेही कल वाढू लागला आहे, हे देखील बोलीभाषांच्या अस्तित्वापुढील एक महत्त्वाचे आव्हान ठरते आहे. पश्चिम बंगालमध्ये 'टोटो' नावाची एक भाषा बोलली जात असे. ही भाषा बोलणा-या लोकांनी बंगाली, नेपाळी आणि हिंदी या भाषा जिभेवर रुळवल्याने बोलू लागल्याने आपोआपच 'टोटो' भाषेतील संवाद कमी कमी होत गेला आणि आता ही भाषादेखील संपण्याच्या वाटेवर आहे. अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच माणसे आता ही भाषा बोलू शकतात, असे दिसून आले आहे. विविध कारणांनी होणारे जनसमूहांचे स्थलांतर आणि त्यामुळे विशिष्ट भाषा बोलणा-या लोकांच्या परस्परसंवादामध्ये पडणारे अंतर हेसुद्धा बोलीभाषा बोलणा-यांची संख्या कमी होत जाण्याचे कारण ठरते.

बहुतांश बोलीभाषांचे अस्तित्व संपण्यामागे त्यांची लिपी नसणे हे एक प्रमुख कारण ठरते, असा काही भाषा अभ्यासकांचा दावा आहे. परंतु, काही अभ्यासक मात्र यात तथ्यांश मानत नाहीत. त्यांच्या मते, भाषेचे अस्तित्व संपण्यामागचे खरे कारण हे भाषेला लिपी नसणे हे नसून संवादात त्या भाषेचा वापर न होणे हे आहे. लोकांच्या मनामध्ये त्यांच्या मातृभाषेविषयी अस्मिता आणि अभिमान असेल तर ती भाषा बोलणा-या व्यक्ती जरी संख्येने अल्प असल्या तरीही ती भाषा निश्चितपणाने टिकून राहते. संख्येने कमी असलेल्या परंतु दीर्घकाळ समाजात टिकून राहिलेल्या अनेक भाषांचा अभ्यास नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयातील भाषा अभ्यासकांनी केलेला आहे.

'अमेरिकन जर्नल ऑफ इंडिजिनिअस स्टडीज'ने केलेल्या संशोधनामध्ये भाषेच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाची बाब अधोरेखित झालेली आहे. त्या नुसार, भाषा आणि जैवविविधता यांचा अगदी जवळचा संबंध असतो. जैवविविधता जिथे समृद्ध असते तिथे जनसमुदाय एकत्रितपणे दीर्घकाळ वास्तव्य करतात आणि आपोआपच



तिथे भाषेचे जतन-संवर्धन होत जाते. काही कारणांनी वा नैसर्गिक आपत्तींमुळे जैवविविधतेचे नुकसान झाले तर त्याचा परिणाम अप्रत्यक्षरीत्या जनसमूहांच्या विस्थापनावर होतो आणि परिणामतः भाषेवरही त्याचा परिणाम होतो बोलीभाषा हे केवळ परस्परसंवादाचे माध्यम नसते तर महत्त्वाचे असे पारंपरिक ज्ञान तिच्यामध्ये सामावलेले असते. बोलीभाषेचा -हास सुरू होतो तेव्हा त्या बरोबर पारंपरिक ज्ञानही अस्तंगत होत जाते असे या अभ्यासांती लक्षात आले आहे. केनियामधील सियासा नावाच्या एका जिल्ह्यामध्ये बोलीभाषेमध्ये पारंपरिक औषधांसंदर्भातील पुष्कळ माहिती समाविष्ट होती. परंतु, जसजसा तिथे आर्थिक विकास होऊ लागला आणि ही भाषा बोलणारे लोक कमी होऊ लागले त्या बरोबर ते पारंपरिक औषधी ज्ञान कायमचे नष्ट होण्याची स्थिती येऊन ठेपली. म्हणूनच, जगभरातील भाषावैज्ञानिक असे मानतात की एखादी भाषा जेव्हा लुप्त होते तेव्हा केवळ ती भाषा मरत नाही तर तिच्या बरोबरीने संपूर्ण संस्कृती आणि परंपरेने चालत आलेले ज्ञानसुद्धा लुप्त होते.

भाषाअभ्यासिका अन्विता अब्बी याच भूमिकेतून गेली अनेक वर्षे विविध बोलीभाषांचा अभ्यास करीत आहेत. त्यांच्या मते, मातृभाषा ही आपल्या विचारांचे, अनुभवांचे आणि आपल्या जीवनविषयक दृष्टीचे प्रतीक असते. जेव्हा एखादी भाषा मरते तेव्हा केवळ समग्र भाषिक वैभवाचेच नुकसान होते असे नाही तर, संपूर्ण समाज, समाजाने जपलेली संस्कृती, भाषेशी जोडलेल्या लोकांचे विचार, हजारो वर्षांपासून त्यांनी भाषेच्या रूपाने जतन केलेले ज्ञान, त्यांच्या धारणा व विश्वास आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, निसर्ग आणि पर्यावरणाला समजून घेण्याच्या दृष्टीने त्या भाषेतून उलगडणारे एक समंजस शहाणपण कायमचे संपून जाते. हे सर्व नुकसान इतके मोठे असते की त्याची भरपाई इतर कशानेही होऊ शकत नाही. लुप्त भाषेची जागा घेऊपाहणा-या दुस-या पर्यायी भाषेने तर अजिबातच नाही!

जगभरात विविध देशांमध्ये ज्या असंख्य बोलीभाषा आहेत त्या सर्व एकसारख्याच तितक्याच महत्त्वाच्या आहेत. केवळ संवादाचे माध्यम म्हणून त्या महत्त्वाच्या नाहीत तर कुठल्याही भाषेचे नाते जगण्याशी आणि संस्कृतीशी असते. अनेक नवनवीन शब्दांचे, संकल्पनांचे भांडार या बोलीभाषांमध्ये असते. त्यामुळे हे सांस्कृतिक संचित काळाच्या ओघात असेच नष्ट होऊनये म्हणून जागतिक पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. जगभरातील बोलीभाषा जतन होण्याच्या दृष्टिकोनातून काय करता येईल या दिशेने पाऊले पडणे निश्चितपणाने नहत्त्वाचे आहे. . ■■

आंतरराष्ट्रीय

# पूरस्थिती रोखण्याचा जपानी मार्ग

जोरदार पाऊस व्हायची खोटी की अनेक शहरांमध्ये, उपनगरांमध्ये पाणी साठून पूरस्थिती निर्माण झाल्याचे चित्र आजघडीला पाहायला मिळते. देशाची आर्थिक राजधानी असणा-या मुंबईत तर हे चित्र अगदी सररासपणे प्रतिवर्षी पाहायला मिळते. अनेकदा रस्त्यांवर प्रचंड पाणी तुंबते. वाहने चक्क पाण्यावर तरंगताना दिसतात. रस्त्यांवर साठणारे पाणी कित्येकदा घरांमध्येही शिरते. मालमत्तेचे नुकसान होते. अशा पाण्यातून वाट काढताना कित्येकजण हकनाक जीव गमावतात. अशी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून सर्वच शहरांत दरवर्षी पावसाळ्यापूर्वीची कामे करून घेण्याचा प्रघात आहे. नालेसफाई, गटारांची स्वच्छता आदी बाबींना प्राधान्य देऊन पाणी वाहून जाण्याचे मार्ग मोकळे राहतील असा प्रयत्न केला जातो. कितीही मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला तरीदेखील पावसाचे पाणी शहरात साठू नये, वाहतूक सुरळीतपणे सुरू राहावी, जनजीवन विस्कळीत होऊ नये आणि पूर परिस्थिती उद्‌भवू नये असाच शहरप्रशासनाचा प्रयत्न असतो.

तरीही गेल्या दशकभरात पुणे, मुंबईसह विविध महत्त्वाच्या शहरांत पावसानंतर ठिकठिकाणी पाठी साठून राहणे आणि पूरस्थिती निर्माण होण्याचे प्रकार वाढल्याचे दिसून येते. मोठा पाऊस झाला की रस्त्यांवर पाणी साठतेच. मग अनेक ठिकाणची वाहतूक ठप्प होते. नागरी मालमत्तेचे आणि वाहनांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसानही होते. अनिर्बंध पद्धतीने झालेले नागरीकरण, साठणारे पाणी वाहून जाण्यासाठी पुरेशा सक्षम यंत्रणेचा असलेला अभाव, नदीपात्रात झालेली बेकायदेशीर बांधकामे, विरळ होत चाललेली शहरातील हिरवाई, पर्यावरणाचा ढासळत चाललेला तोल आणि झपाट्याने वाढणारी सिमेंटची जंगले या आणि अशा अनेकविध कारणांमुळे शहरांमध्ये पाणी लगेच साठते आणि त्याचा लवकर निचरा होत नाही असे लक्षात आले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आगामी दशकभरात मुंबईची अनेक उपनगरे पाण्याखाली जाण्याचा धोका संभवतो, अशी आशंकावजा भीती अभ्यासक व्यक्त करीत आहेत. जी परिस्थिती मुंबईच्या बाबतीत तेच चित्र राज्यातील आणि देशांतील अनेक शहरांच्या



बाबतीत सामाईकरीत्या दिसून येते. त्याहून गंभीर बाब म्हणजे, या समस्येचे स्वरूप प्रतिवर्षी अधिकच तीव्र होत चालल्याचे लक्षात येत असल्याने आता तरी त्या संदर्भात ठोस पावले तातडीने उचलण्याची गरज निर्माण झालेली आहे. अशा प्रभावी उपाययोजनांचा विचार करू जाता जपानने या समस्येवर शोधलेले उत्तर प्रभावी ठरले होते असे लक्षात येते.

भारतातील अनेक शहरांना आजघडीला जी समस्या भेडसावते आहे तीच समस्या काही वर्षांपूर्वी जपानची राजधानी असलेल्या टोकियो शहराला आणि जपानमधील आसपासच्या अन्य शहरांनादेखील भेडसावत होती. मोठ्या प्रमाणात झालेले नागरीकरण, वेगाने होणारे औद्योगिकीकरण आणि जलनिचरा व्यवस्थापनाचा अभाव या प्रमुख कारणांमुळे पाऊस आल्यानंतर पूराची स्थिती आणि ठिकठिकाणी पाणी साठून राहणे टोकियो शहरात अगदी नित्याचे झालेले होते. या पूरस्थितीचा जनजीवनावरही विपरित परिणाम होत असे. लोकांचे खूप हाल होत असत आणि पूरस्थितीतून बाहेर येऊन जनजीवन पूर्वपदावर येण्यासाठी बराच काळ जात असे. त्यामुळे लोकांना या परिस्थितीत बदल हवा होता. तसे पाहायला गेले तर, गेल्या कित्येक दशकांपासून जपान आणि महापूर हे समीकरण बनलेले आहे. १९४७ साली Tayfun Kathlin नावाचे एक वादळ जपानला येऊन धडकले होते. जपानमधील ३१ हजार घरे त्या वादळाने उद्‌ध्वस्त केली होती. १७००हून अधिक नागरिकांचा वादळाच्या तडाख्यात मृत्यू झाला होता. पुढे दशकभरातच Tayfun Kanagawa या नव्या वादळाने असाच सर्वत्र हाहाकार उडवला होता. त्या वेळी जपानमध्ये आठवड्याभरात ४०० मिलिमीटर इतका प्रचंड पाऊस झाला होता. जपानमध्ये भीषण पूरपरिस्थिती निर्माण झालेली होती. रस्ते, घरे, बाजारपेठा अशा सर्वच ठिकाणी पुराचा मोठा फटका बसला होता आणि जनजीवन पुरते विस्कटून गेले होते. कितीतरी लोकांनी या पुराच्या तडाख्यामध्ये आपले सर्वस्व गमावलेले होते. या पूरातून सावरल्यानंतर मात्र जपानने परिस्थिती बदलण्याचा निर्धार केला आणि हे चित्र बदलण्यासाठी कंबर कसून प्रयत्न सुरू केले आणि त्यासाठी मदत घेतली बुद्धिमान अशा अभियंत्यांची.

मुळातच जपानी माणसे शिस्तप्रिय, नियोजनबद्ध आणि कष्टाळू वृत्तीची. एखादी गोष्ट करायचे ठरवले की इतर कशाचीही पर्वा न करता ती पूर्णत्वास नेण्यासाठी झटणे हा त्यांचा मूळ स्थायीभाव आहे. त्यातून एखादे काम हाती घेतले की ते नेटाने पुढे नेऊन पूर्णत्वास नेतातच. त्यामुळे पूरपरिस्थितीला तोंड देण्यासाठीदेखील आपल्याला

काही ठोस पावले उचलता येतात का, या दिशेने विचार करून त्या संदर्भातील एक आराखडा निश्चित करण्यात आला. जपानमधील हुशार अभियंत्यांना एकत्रित करून कोणती योजना प्रभावी ठरू शकते यावर अतिशय गांभीर्याने विचार सुरू झाला आणि मग त्यासाठी अनेकानेक नव्या कल्पना पुढे येऊ लागल्या. देशाची राजधानी टोकियोला सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले. पावसाचा जोर कितीही राहिला आणि पूरस्थिती निर्माण होऊ लागली तरीदेखील शहरात पाणी साठू नये आणि जनजीवन विस्कळीत होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निश्चित झाले. रस्त्यांवर पाणी साठून वाहतूक कोंडी होऊ नये तसेच पूरस्थिती उद्‌भवू नये म्हणून तितकीच सक्षम, दीर्घकाळ टिकेल अशी प्रभावी यंत्रणा उभी करणे आवश्यक होते. हे नियोजन पूर्णत्वास नेण्यासाठी आणि टोकियोला समस्यामुक्त करण्यासाठी विचारमंथन सुरू झाले. अभियंत्यांनी अनेक कल्पना पुढे आणल्या. अंतिमतः एका महाकाय अशा प्रकल्पाची कल्पना पुढे आली. शहराची समस्या एका कल्पनेद्वारे पूर्णपणे निकाली निघेल असा विश्वास त्या वेळी व्यक्त करण्यात आला.

कोणतीही आपत्ती कधीही सांगून येत नाही. त्यामुळे भविष्यात खूप मोठी नैसर्गिक आपत्ती आली तरी त्यात टिकून राहू शकता येईल, अशा स्वरूपाचे नियोजन करून आपत्ती व्यवस्थापन करणे महत्त्वाचे असते. जपानमध्ये तर भूकंपासह विविध नैसर्गिक आपत्ती पाचवीला पुजलेल्या असतात हे लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापनासाठी जपान नेहमीच भरीव आर्थिक तरतूद करीत आलेला आहे. नव्या प्रकल्पाला काहीही कमी पडू नये याची तजवीज करण्यात आली. हे बांधकाम करताना अभियंत्यांनाही त्याचे वैशिष्ट्य आणि महत्त्व लक्षात आलेले होते. पावसाचा जोर कितीही राहिला आणि पूरस्थिती निर्माण होऊ लागली तरीदेखील शहरात पाणी साठू नये आणि जनजीवन विस्कळीत होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निश्चित झाले. सक्षम, दीर्घकाळ टिकेल अशी प्रभावी यंत्रणा उभी करण्यासाठी जे प्रयत्न झाले ते नक्कीच कौतुकास्पद होते. शहराची पूराची समस्या पूर्णपणे निकाली निघेल असा विश्वास त्या वेळी व्यक्त करण्यात आला. या यंत्रणेला 'भूमिगत मंदिर' असे नाव दिले गेले. टोकियो शहराला पुराच्या पाण्यापासून वाचवण्यासाठी जमिनीखाली अजस्त्र टाक्या बांधून जमिनीवर साठणारे पाणी त्यात तातडीने साठवण्याची यंत्रणा उभारायची आणि जलवाहिन्यांद्वारे हे पाणी पुढे लांब नेऊन नदीत सोडून द्यायचे, असे नियोजन जपानी अभियंत्यांनी केले होते. सरकारसमोर ही योजना मांडण्यात आली. त्यावर



मंजुरीची मोहोर उमटल्यानंतर त्या भव्य अशा प्रकल्पासाठी अब्जावधींची तरतूद करण्यात आली. जमिनीखाली बांधकाम करणे खर्चिक आणि अर्थातच आव्हानात्मक होते परंतु, त्यात यश मिळाले की टोकियोची पुराची डोकेदुखी कायमची संपेल असा विश्वास होता. हे संपूर्ण काम करण्यासाठी मोठा कालावधी लागला. आजही जगभरात हे काम 'कॅथेड्रल वॉटर टँक' या नावाने सुपरिचित आहे. पुराच्या पाण्यापासून शहराचे संरक्षण व्हावे, पावसाचे पाणी शहरात कुठेही साठून राहू नये यासाठी जपानी अभियंत्यांनी जी योजना आखली त्या योजनेला नाव दिले, 'मेट्रोपोलिटन एरिया आऊटर अंडरग्राउंड डिस्चार्ज चॅनल' (MAOUDC). या प्रकल्पाची प्रत्यक्ष कार्यवाही खूप नियोजनबद्ध रीतीने करण्यात आली. पाहणारा कोणीही थक्क होऊन जाईल अशा पद्धतीचे हे बांधकाम आहे. जमिनीखाली २२ मीटर खोल अंतरावर ही यंत्रणा प्रस्थापित केलेली आहे. जमिनीखाली ६.३ किलोमीटर लांबीचे रस्ते तसेच पाचशे टन वजनाचे अजस्त्र खांब उभे करण्यात आलेले आहेत. ही जपानी पूरनिरोधक यंत्रणा अवघ्या जगाच्या दृष्टीने एक आश्चर्य बनलेली आहे. Metropolitan Area Outer Underground Discharge Channel या नावाने ही यंत्रणा विख्यात असून जगातील या स्तरावरची सर्वात मोठी पूरनिरोधक यंत्रणा म्हणून तिच्याकडे पाहिले जाते.

जमिनीखाली एकूण चार मैल परिसरात हे बांधकाम पसरलेले आहे. भूगर्भामध्ये जणू एखाद्या चक्रव्यूह असावा तशी अंतर्गत रचना करण्यात आलेली आहे. अडीच हजार घनफूट आकाराच्या प्रचंड टाक्या उभारण्यात आलेल्या आहेत. त्यांना Kasukabe Flood Tank म्हटले जाते. 'जी-कॅन्स' असेही त्यांचे नाव आहे. पाणी साठवणा-या या टाक्या जपानपासून २० मैल अंतरावर असलेल्या Kasukabe येथे उभारण्यात आल्या आहेत. दोन शहरांना या पद्धतीने जोडणारी ही यंत्रणा जमिनीखाली १६५ फूट खोल अंतरावर कार्यरत आहे याची भूपृष्ठावरून कल्पनासुद्धा येणार नाही. वरकरणी अदृश्य वाटणारी ही यंत्रणा पूरस्थिती रोखण्याचे व साठणा-या पाण्याचा योग्य रीतीने निचरा करण्याचे काम मात्र अतिशय प्रभावीपणाने करते. टोकियोतील दाट लोकवस्तीचा भाग हा कमी सखल आहे. नद्यांनी वेढलेला परिसर असल्याने पूर येण्याची शक्यता अधिक आहे. त्या पार्श्वभूमीवर, प्रत्येक सेकंदाला सात हजार क्युबिक फूट पाणी सामावून घेण्याची प्रचंड क्षमता या 'जी-कॅन्स'मध्ये निर्माण केलेली आहे. टाक्यांमध्ये साठवले जाणारे हे पाणी पुढे जलवाहिन्यांद्वारे वाहून नेले जाते आणि Edogawa या नदीत सोडले जाते.

आजघडीला आशिया खंडातील एक प्रगत देश म्हणून जपानकडे पाहिले जाते. चार मोठ्या आणि अनेक छोट्या द्वीपांच्या समूहाद्वारे हा देश साकारलेला आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने बघितले तर जगात या देशाचा ११ वा क्रमांक लागतो. टोकियो हे शहरदेखील लोकसंख्येच्या दृष्टीने गजबजलेले आहे. पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला तर शहरामध्ये साठणारे पाणी ही टोकिया शहरासाठी काही वर्षांपूर्वीपर्यंत अगदी नित्याची बाब होती. त्यातून जपानमधील तापमान हे बेभरवशाचे असल्याने आणि नैसर्गिक आपत्तींचे संकट केव्हाही येऊ शकत असल्याने नागरिकांना कायमच सतर्क राहावे लागते. या सगळ्या पार्श्वभूमीवर किमान पुराच्या पाण्याचे नियंत्रण करू शकेल अशा सक्षम यंत्रणेची नितांत आवश्यकता होती. त्या पार्श्वभूमीवर भूमिगत स्वरूपात साकारलेली ही अजस्त्र यंत्रणा अतिशय महत्त्वाची ठरली आहे.

जपानचा पूर्वेतिहास पाहिला तर बहुतांश वेळेला पुरासारखी आपत्ती ठराविक भागात येत असे. Kasukabe या शहराच्या झालर क्षेत्रातील शेतीचेच अधिकतर नुकसान होत असे. परंतु, कालांतराने परिस्थिती बदलली. या शहराचा विकास झाला. लोकसंख्याही वाढत गेली. त्यामुळे विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत टोकियोच्या बरोबरीने Kasukabe हे शहरसुद्धा विकसित झाले आणि त्याच्याबरोबरीने या दोन्ही शहरांना संभवणारा पुराचा धोकाही वाढत गेला. जपानमध्ये १९९१ साली पुन्हा पूरस्थिती उद्‌भवली. त्यावेळी चक्रीवादळेही आली. जवळपास ३० हजारांहून अधिक घरांचे तय्याआपत्तीत नुकसान झाले आणि मोठी जीवितहानीसुद्धा झाली. त्यामुळे पूरपरिस्थितीला सक्षमपणे तोंड देऊ शकेल अशा एखाद्या सक्षम यंत्रणेची नितांत आवश्यकता होती. म्हणूनच जपानने मोठी आर्थिक गुंतवणूक करून यातून मार्ग काढण्यासाठी पावले उचलली आणि ही यंत्रणा उभी केली. त्या नंतर नियोजनबद्ध प्रयत्नांची कास धरून पुराच्या समस्येवर जपानने यशस्वी रीतीने मात केली. विलक्षण कल्पकतेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत त्यांनी अवघड वाटणारे हे लक्ष्य साध्य करून दाखवले. यामुळे टोकियो शहरात मोठा पाऊस झाला तरीही आता कुठेही पाणी साठून राहत नाही.

जपानच्या अर्थसंकल्पीय तरतुदींपैकी सहा ते सात टक्के आर्थिक तरतूद आपत्ती निवारणासाठी केलेली असतेच. जपानने या महाकाय प्रकल्पाची मुहूर्तमेढ १९९३ साली रोवत असताना दोन अब्ज अमेरिकी डॉलर्सची प्रचंड गुंतवणूक केली. हा प्रकल्प पूर्णत्वास जाण्यासाठी १३ वर्षे लागली. Lee Kuan Yew School of Public Policy या सिंगापूरस्थित शिक्षणसंस्थेने या प्रकल्पाचा तपशीलवार अभ्यास



केलेला आहे. येथील अभ्यासिका Silsila Tortajada यांनी प्रत्यक्षात तिथे जाऊन या महाकाय बांधणीचा खूप बारकाईने अभ्यास केला आणि त्यावर शोधप्रबंधही सादर केला. त्यांच्या मते, अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा एक अद्‌भुत असा चमत्कार आपल्याला तिथे पाहावयास मिळतो. एखाद्या आपत्तीवर मात करायची ठरवले तर माणूस काय करू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून या प्रकल्पाकडे पाहावयास हवे, असे त्यांनी संशोधन अहवालात नमूद केलेले आहे. मात्र, भविष्यातील आव्हाने लक्षात घेता प्रस्थापित यंत्रणादेखील पुरेशी ठरेल का, असा प्रश्न आता अभ्यासक उपस्थित करू लागलेले आहेत. कारण, सध्याच्या काळात पुरामुळे निर्माण होणारी परिस्थिती या देशासाठी चिंतेची बाब बनते आहे. गेल्या काही वर्षांत जपानमधील परिस्थितीही बदलत गेली असल्याने आता नव्या पर्यायांचा शोध घेण्याची गरज भासू लागलेली आहे. University of Yamanashi या विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक व संशोधक Yasunori Hada यांच्या मते १९९५ ते २०१५ या कालावधीत देशाच्या पूरग्रस्त भागात राहणा-यांची संख्या साडे चार टक्क्यांनी वाढली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, २१ व्या शतकामध्ये जपानमधील पर्जन्यमान १० टक्क्यांनी वाढण्याचा संभव आहे. आगामी काळामध्ये चक्रीवादळे वाढण्याचीही शक्यता अभ्यासकांकडून वर्तवली जाते आहे. २०१९ साली जपानला वादळाचा मोठा तडाखा बसला होता. त्यावेळी शेकडो नद्यांचे काठ फुटले होते आणि भीषण पूरस्थिती उद्‌भवलेली होती. पूर्वी कधीही निर्माण झालेली नव्हती अशी परिस्थिती या वादळांच्या तडाख्याने अलीकडच्या काळात निर्माण झाल्याचे अनुभवास येते आहे. त्या पार्श्वभूमीवर, आज कार्यरत असलेली ही प्रस्थापित यंत्रणा कितीही अजस्त्र व सक्षम वाटली तरी भविष्यातील वाढती संभाव्य आव्हाने लक्षात घेता पुरेशी ठरेल का हा कळीचा मुद्दा ठरतो आहे. त्यामुळे केवळ याच यंत्रणेवर अवलंबून न राहता अन्य नवे पर्याय असू शकतात का, यांचा शोधही सुरू झाला आहे. दोन मैलांचा प्रचंड बोगदा तयार करून त्याद्वारे पुराचे पाणी Furukawa या जलाशयात साठवण्याची व्यवस्था करणे, हा अशाच प्रयत्नांचा एक भाग आहे. सद्य:स्थितीत या जलाशयात पाच दशलक्ष घनफूट इतके पाणी साठवले जाऊ शकते. तरीदेखील जागतिक तापमानवाढीचे आव्हान, समुद्राची वाढती पातळी यासारख्या आव्हानांचा विचार करता सध्याच्या उपाययोजना प्रभावी असल्या तरी पुरेशा नाहीत असे अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे भविष्याचा विचार करून पूरस्थितीचा सामना करू शकणारे नवे पर्याय जपानला शोधावेच लागणार आहेत.■■

## जिकडे-तिकडे

# न उलगडलेले गूढ उडत्या तबकड्यांचे

पृथ्वीप्रमाणे अंतराळात अन्यत्र कुठे जीवसृष्टी आहे का या प्रश्नाचा शोध घेण्यासाठी अंतराळ-संशोधकांनी आजवर खूप प्रयत्न केलेले आहेत. पृथ्वीप्रमाणेच चंद्र किंवा मंगळावरही जीवसृष्टी आहे किंवा कसे, याचा शोध घेण्यासाठी अनेक देशांनी विविध अंतराळ मोहिमाही आजवर पूर्ण केल्या आहेत. अंतराळातील जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी अवकाशसंशोधकही सातत्याने प्रयत्नशील असतात. अर्थात, या अथक प्रयत्नांनंतरही पृथ्वीव्यतिरिक्त अन्य एखाद्या ग्रहावर जीवसृष्टी असल्याचे ठोस पुरावे प्राप्त झालेले नाहीत. परंतु, पृथ्वीवर जशी जीवसृष्टी विकसित झालेली आहे आणि इथे माणसांची वस्ती आहे तशीच कुठल्या तरी अन्य ग्रहावर निश्चितपणाने जीवसृष्टी आणि परग्रहवासीसुद्धा असणार असा ठाम विश्वास बाळगणारे अनेकानेक संशोधक आहेत. या संदर्भात त्यांनी जे आडाखे बांधलेले आहेत ते जगभरात प्रसिद्ध आहेत. या परग्रहवासियांचे पृथ्वीवर सतत लक्ष असते असाही अनेकांचा दावा आहे. आकाशात अवचितपणे दिसणा-या काही गोष्टी म्हणजे परग्रहवासियांच्या अस्तित्वाचाच पुरावा होय, असेही सांगितले जाऊ लागले.

या सगळ्यांमध्ये कायमच चर्चेत राहिलेली एक गोष्ट म्हणजे उडती तबकडी. अवचितपणाने आकाशात उडती तबकडी दिसल्याचे दावे आतापर्यंत अनेक देशांतील लोकांनी वेळोवेळी केलेले आहेत. परंतु, यातील कोणत्याही बाबींना सबळ पुरावा नसल्याने या गोष्टी कायम अफवाच मानल्या गेल्या आहेत. मात्र, अमेरिकी लष्करातील सैनिकांनीदेखील आपल्याला वेळोवेळी उडत्या तबकड्या दिसल्याचा दावा केलेला असल्याने हा विषय अलीकडेच नव्याने चर्चेत आला. सैनिकांना दिसणा-या त्या वस्तू म्हणजे खरोखरच उडत्या तबकड्या आहेत की देशावर पाळत ठेवण्यासाठी अथवा हेरगिरी करण्यासाठी शोधून काढलेल्या त्या नव्या क्लृप्त्या आहेत, हे कळू न शकल्याने अमेरिकेने या विषयाचा शोध घेण्यासाठी एक समितीच नेमली होती. या समितीने अलीकडेच तिचा अहवाल सादर केला आहे. गेल्या सहा वर्षांत अमेरिकी सैनिकांनी अनेकदा उडत्या तबकड्या दिसल्याचा दावा केल्याचे त्यात नमूद केलेले आहे.



अमेरिकेची सुरक्षा यंत्रणा असलेल्या 'पेंटगॉन'ने या संदर्भात एक सविस्तर अहवाल प्रसिद्ध केलेला आहे. अमेरिकी लष्करातील सैनिकांना वेळोवेळी उडत्या तबकड्या दिसत असल्याची नोंद त्यांत केलेली आहे. २००४ सालापासून आतापर्यंत सैनिकांना १४४ वेळा उडत्या तबकड्या दिसल्याची त्यात म्हणलेले आहे. त्यामुळे या उडत्या तबकड्यांचे नेमके गूढ आहे तरी काय हे शोधून काढणे अत्यावश्यक असल्याचे अहवालामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. आकाशामध्ये उडत्या गोष्टी दिसत असल्याची तक्रार अमेरिकी सैनिकांनी या पूर्वी वेळोवेळी केलेली होती. त्या तक्रारींचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन त्यातील सत्यता पडताळून पाहण्यासाठी Unidentified Aerial Phenomena Task Force (UAPTF) या कृतीदलाची स्थापना करण्यात आली. उडत्या तबकड्या पाहिल्याचा दावा करणा-या सैनिकांची चौकशी करण्यात आली. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अहवाल तयार करून लष्कराला तो सादर करण्यात आला आहे.

उडत्या तबकड्या दिसल्याचा दावा करणा-या संबंधित अमेरिकी नौदलातील काही सैनिकांनी पुराव्यादाखल काही छायाचित्रे व चित्रफितीदेखील सादर केल्या. मात्र, अमेरिकेने ती माहिती कधीही उघड केलेली नव्हती. परंतु, अलीकडेच ही सगळी माहिती उघड झाल्यानंतर ती समाजमाध्यमांवर वेगाने पसरली. त्यामुळे हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आणि या विषयाच्या मुळाशी जाऊन त्याची वस्तुनिष्ठता तपासणे गरजेच झाले. सैनिकांना आकाशात आढळून आलेल्या अनोळखी हालचाली रडारमध्ये कैद का झाल्या नाहीत. सैनिकांना खरोखरीच तसे काही दिसले की विनाकारण असे दावे करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न होतो आहे का, अन्य देशांचे छुपे 'ड्रोन' हेरगिरी करण्याचा प्रयत्न तर करीत नाहीत ना असे अनेक प्रश्न त्यातून उपस्थित झाले. त्यामुळे या घटनांमागचे गूढ आणि त्यातील सत्यासत्यता जाणून घेणे गरजेचे झाले. Unidentified Flying Objects अर्थात 'युएफओ'विषयी अधिक माहिती मिळवण्याचा, त्यांचा पूर्वेतिहास जाणून घेण्याचा व या संकल्पनेचा मूळ उगम शोधून काढण्याचा प्रयत्न करण्यासाठी अभ्यासकांची तसेच या क्षेत्रातील तज्ज्ञ शास्त्रज्ञांची एक समिती नेमण्यात आली. आपल्या अहवालाद्वारे त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या समितीने केला. या दस्तऐवजाच्या माध्यमातून या संदर्भातील काही महत्त्वाच्या घटना-घडामोर्डी उलगडव्यात आणि त्याद्वारे वस्तुस्थिती जाणून घेता यावी यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

सैनिकांना उडत्या तबकड्या दिसल्याच्या जितक्या घटना अलीकडच्या काळात घडलेल्या आहेत, त्यातील बहुतांश घटना गेल्या दोन वर्षांतील आहेत. त्यापैकी जवळपास बहुतांश घटनामागील तथ्य अद्याप उलगडलेले नाही. या गोष्टींचा परग्रहाशी संबंध आहे की नाही, हे देखील स्पष्टपणे कुणालाही सांगता आलेले नाही. जर तसे नसेल तर, रशिया अथवा चीन यांनी विकसित केलेले एखादे नवे तंत्रज्ञान, अथवा छुपे 'ड्रोन' किंवा हेरगिरी करण्याचे हे काही नवे प्रयोग आहेत का याचाही शोध घेतला जातो आहे. तशी शक्यता अभ्यासकांनी या अहवालात नमूद केलेली आहे. उडत्या तबकड्या कदाचित प्रत्यक्षात असूही शकतील असाही अंदाज अहवालात वर्तवण्यात आलेला आहे. म्हणूनच अशा घटनांमागील गूढ उकलून खरी परिस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचे मोठे आव्हान सर्वच संबंधितांच्या पुढ्यात आहे.

या संदर्भात, आजवर घडलेल्या अशा घटनांचा धांडोळा घेतला असता उडत्या तबकड्या हा विषय जवळपास शतकभरापासून चालत आलेला आहे असे लक्षात येते. त्याचप्रमाणे केवळ अमेरिकेतच नव्हे तर चीन, रशिया, ब्रिटन आदी देशांतही या पूर्वी उडत्या तबकड्या किंवा ओळखू न येणा-या वस्तू आकाशात दिसल्याचा दावा अनेक लोकांनी केलेला आहे. 'उडत्या तबकड्या' हा शब्द प्रथमतः अस्तित्वात आला तो १९४० साली. अमेरिकेतील काही लोकांनी उडत्या तबकड्या आकाशात दिसल्याचा दावा सर्वप्रथम केला होता. न्यू जर्सी येथे नागरिकांना एक उडती तबकडी दिसली होती व त्यांनी तिचे छायाचित्रही काढले होते. तेव्हापासून हा विषय चर्चेत आला. काही काळानंतर अमेरिकेत पीट्सबर्ग येथील जंगलामध्ये अशाच पद्धतीची एक उडती तबकडी दिसली असल्याचा दावा प्रत्यक्षदर्शींनी केला होता. ही तबकडी दीर्घकाळ आकाशात होती त्या नंतर तिचा प्रचंड मोठा विस्फोट झाला असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले होते. त्या वेळीही या घटनेमागील सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला होता. परंतु, अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था असलेल्या 'नासा'ने लोकांचे दावे फेटाळून लावले होते. आकाशात दिसलेली ती उडती तबकडी नव्हती तर तो वस्तुतः उल्कापात होता, असे 'नासा'ने जाहीर केले. मात्र, ती उडती तबकडीच होती, यावर प्रत्यक्षदर्शी ठाम राहिले. १९४७ साली Kenneth Arnold हे प्रख्यात अमेरिकी उद्योजक आपल्या छोटेखानी विमानातून जात असताना त्यांना एका पर्वतावरून नऊ तबकड्या उडत जाताना दिसल्या. त्या वेळीदेखील, त्या वस्तू म्हणजे नक्की काय होते याचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला.



अशीच आणखी काही उदाहरणे समोर आल्यानंतर अमेरिकी वायुदलाने Project Sign या नावाने एक शोधमोहिमच हाती घेत त्या घटनांमागील सत्यता शोधण्याचा प्रयत्न केला. Kenneth Arnold यांना ज्या उडत्या तबकड्या वाटल्या होत्या ती नव्याने विकसित केलेली रशियन बनावटीची विमाने होती, असे या समितीने स्पष्ट केले. उडत्या तबकड्यांबाबतचे दावे नंतरच्या काळातही होतच राहिले. त्यामुळे Project Blue Book ही शोधमोहिम हाती घेण्यात आली. पुढे अनेक समित्यांनी यात संकलित केलेल्या माहितीचा अभ्यास केला. National Academy of Sciences या संस्थेच्या ३७ शास्त्रज्ञांनी उपलब्ध सर्व पुराव्यांचा आणि उडत्या तबकड्यांविषयीच्या ५६ दाव्यांचा अभ्यास केला. परग्रहवासियांच्या अस्तित्वाचा कोणताही ठोस पुरावा नसल्याने उडत्या तबकड्या अस्तित्वात असल्याचे कोणतेही दाखले देता येत नाहीत, या निष्कर्षापर्यंत हे शास्त्रज्ञ आले. अभ्यासकांनी हा निर्वाळा दिल्यानंतरदेखील उडत्या तबकड्यांचे आकर्षण व त्या विषयीच्या चर्चा पुढेही कायम सुरूच राहिल्या. रशियामध्ये १९८९ सालापासून अनेकदा उडत्या तबकड्या दिसलेल्या आहेत. अनेक गावांमधील लोकांनी, मुलांनी उडत्या तबकड्या दिसल्याचे दावे केले आहेत. इतकेच नव्हे, तर रशियातील एका गावात तर प्रत्यक्षात परग्रहवासियांचे यान उतरले असल्याचाही दावा करण्यात आला होता. विविध देशांमध्ये उडत्या तबकड्या दिसल्याचा दावा करणारे अनेकजण असले तरीही त्या बाबतचा खात्रीशीर पुरावा मात्र मिळालेला नाही.

उडणा-या तबकड्या पाहिल्याचा दावा करणा-या प्रत्यक्षदर्शींच्या मते, आजघडीला उपलब्ध असणारी विमाने, 'ड्रोन' किंवा अन्य कोणत्याही साधनांपेक्षा या उडत्या तबकड्या निश्चितपणे वेगळ्या असतात. मात्र, अधिकृत पुरावा मिळेपर्यंत तरी या उडत्या तबकड्या किंवा आकाशात अकस्मिकपणे दिसणा-या कोणत्याही गोष्टी परग्रहावरील आहेत असे ठामपणाने म्हणता येत नाही. संशोधक अजूनही या विषयावर सातत्याने संशोधन करीत आहेत आणि त्यामागील सत्य जाणून घेण्याचा त्यांचे प्रयत्न जारी आहेत. इतक्या वर्षांच्या कालावधीत विविध देशांतील असंख्य लोकांना कित्येकदा दिसलेल्या आकाशातील या अनोळखी गोष्टींकडे सरसकटपणाने दुर्लक्ष करून चालणार नाही आणि त्याचबरोबर अशा अनोळखी वस्तू म्हणजेच परग्रहवासियांच्या अस्तित्वाचा पुरावा होय, असेही मानून चालणार नाही. अंतिमतः जेव्हा या विषयातील खरे सत्य उजेडात येईल तेव्हाच उडत्या तबकड्यांसंदर्भात जनमानसाच्या मनात असलेले गूढ उकलू शकेल हेच खरे. ■■

*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

काळाचा एकंदरच रेटा जबरदस्त आहे हे मान्यच. त्या रेट्यापायी अनेकानेक बाबींमध्ये बदल घडून येणारच हेही कबूल. पण तरीही, काही गोष्टी जपण्यासाठी केवळ सामाजिकच नव्हे तर, व्यक्तिगत पातळीवरही प्रयत्नांची गरज आहे व असते. मुदलात, त्यासाठी हवी प्रबळ इच्छाशक्ती. बोलीभाषांचे रक्षण-संवर्धन ही अशीच एक बाब. आजची परिस्थिती मोठीच विचित्र झालेली आहे. एकीकडे, आर्थिक सुधारणांद्वारे शासनसंस्था आणि खासगी क्षेत्र यांच्या कार्यकक्षांची फेरआखणी जारी आहे. तर, दुसरीकडे अनेक गोष्टी सरकारनेच पुढाकार घेऊन कराव्यात, अशीही एक मानसिकता नांदताना दिसते. बोलीभाषा जपण्यासारख्या विषयांच्याबाबतीत तर हा मुद्दा अधिकच कळीचा ठरतो. कारण, आज परिस्थिती अशी आहे की, कोणत्याही भाषेचे व्यावहारिक स्थान व महत्त्व हे ती भाषा बोलणा-या समाजाचे आर्थिक अंग किती सक्षम व भरभक्कम आहे, यांवर बहुशः अवलंबून असल्याचे चित्र प्रकर्षाने पुढ्यात उभरते. मुळात, ज्या भाषेला लिपीच नाही अशा बोलीभाषांचा टिकाव प्रचलीत मानसिकतेमध्ये लागणे, त्यांपायी, कमालीचे दुष्कर सिद्ध होते. खास करून, अशा बोलीभाषांच्या वापरामध्ये त्या त्या समूहातील नवीन पिढ्यांनाच रस नसेल तर बाब अधिकच गुंतागुंतीची बनते. प्राचीन काळी भाषाभ्यासकांना राजाश्रय लाभत असे. राजाश्रयाद्वारे समाजमान्यतेची मोहोरही अशा अभ्यासकांवर व ते जोपासत असलेल्या व्यासंगावर आपसूकच उमटत राही. आज, कोणत्याही भाषेबद्दल अंगभूत आस्थाच विरळ होताना दिसते. भाषाविनिमय मुख्यतः आर्थिक संबंधांशी निगडित बनतो आहे. आता, एखाद्या भाषेचे जगणे-मरणे ती भाषा बोलणा-या समाजसमूहांच्या आर्थिक-भौतिक सुबत्तेवर अवलंबून राहणार असेल मग बोलणेच खुंटते ! कितीही वेदना झाल्या तरी आजचे हे कठोर वास्तव स्वीकारण्याखेरीज गत्यंतर दिसत नाही. ■■

**संदर्भः** (1) https://www.worldscientific.com/doi/abs/10.1142/9789814280464_0007. (2) https://academic.oup.com/cje/article-abstract/19/6/735/1688941 (3) http://news.bbc.co.uk/2/hi/8500108.stm (4) https://www.bbc.com/future/article/20181129-the-underground-cathedral-protecting-tokyo-from-floods (5)https://www.globalcitizen.org/en/content/japan-flood-control-superstructure-china-tokyo/ (6) https://www.britannica.com/topic/unidentified-flying-object. ■■



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# वाचनीय नवीन पुस्तके

**Overdraft : Saving the Indian Saver**
**Authored by - Urjit Patel,**
**Harper Business, Noida,**
**Uttar Pradesh, First edition 2020,**
**Pp. xv+195, Price - Rs. 599/-**

आपल्या देशातील बँकिंग क्षेत्र सध्या एका मोठ्या संक्रमणपर्वातून वाटचाल करते आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी त्यांच्या कार्यकाळात बँकांच्या मालमत्तेची गुणात्मक चिकित्सा करण्याची प्रक्रिया कार्यान्वित केली आणि या क्षेत्रातील काही संवेदनशील अशा बाबी प्रकाशमान बनल्या. थकित कर्जांचा सरकारी बँकांच्या माथ्यावर असणारा मोठा बोजा, ही त्यांतीलच एक कळीची बाब. बँकांमधील ठेवी म्हणजे खरे तर सर्वसामान्य नागरिकांची बचत. या बचतठेवी हीच बँकांमार्फत केल्या जाणा-या कर्जनिर्मितीची गंगोत्री. साहजिकच, थकित कर्जे ही त्यांमुळे केवळ संबंधित बँक व थकबाकीदार यांच्या पुरतीच सीमित अशी चिंतेची बाब उरत नाही. सर्वसाधारण बचतदारांच्या ठेवींची सुरक्षा हा त्यांतील खरा संवेदनशील मुद्दा होय. थकबाकीदारांमध्ये देशातील कॉर्पोरेट विश्वात अग्रेसर असणा-या अनेक कंपन्या आहेत. थकित अथवा बुडीत कर्जे ही, एक प्रकारे, बचतदारांनी ठेवींच्या रूपाने बँकांमध्ये संचयन केलेल्या गंगाजळीची सर्वच संबंधितांनी दक्ष काटेकोरपणे व्यवस्थापन करण्याबाबत दाखवलेल्या हलगर्जीपणाची परिणतीच ठरते. डॉ. रघुराम राजन यांच्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदाची सूत्रे आली डॉ. ऊर्जित पटेल यांच्या हाती. ते वर्ष होते २०१६. थकित कर्जांच्या या समस्येने विशेषतः सरकारी बँका आणि थकबाकीदार कॉर्पोरेट कंपन्या असे दोघेही आजघडीस कमालीच्या अडचणीमध्ये सापडलेले आहेत. थकित कर्जांच्या या संपूर्ण समस्येचा उद्‌भव, त्याची कारणे, विस्तार आणि मुख्य म्हणजे, तिच्यापायी निर्माण झालेल्या नानाविध अडचणींवर काढता येण्याजोगे तोडगे यांचे विश्लेषक व व्यावहारिक विवरण करणारा हा ग्रंथ अभ्यासकांइतकाच जिज्ञासू अभ्यासप्रेमींनाही रोचक व उद्‌बोधक ठरावा. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Published and Posted at Model Colony Post Office Pune,
on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**